राष्ट्रोत्थानाय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४

Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**तातडीचे**

जा क्र.तिविकापु/आस्था-१/२०२२/ 4484

दिनांक : 29 MAR 2022

प्रति,

संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

**विषय- कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्ती / सेवा नियमित करण्याबाबतची चौकशी**

संदर्भ- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/२०२२/२०६ दि.२८/०३/२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये , या कार्यालयाच्या अधिपत्याखालील नियमित झालेल्या कंत्राटी अध्यापकांची अपूर्ण राहिलेली दस्तऐवज पडताळणी ही दिनांक ११/०४/२०२२ ते २०/०४/२०२२ या कालावधीत शासकीय मुद्रणतंत्र संस्था,सर जे.जी.समुह कला महाविद्यालय आवार,डॉ डी एन रोड,मुंबई येथे करण्यात येणार आहे.

तद्नुषंगाने आपणांस कळविणेत येते की, या कार्यालयांत आपल्या संस्थेचे कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्ती / सेवा नियमित करण्याबाबतचे जे दस्तऐवज जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत, ते सर्व दस्तऐवज आपल्याकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहेत. सबब आपल्या संस्थेतील आस्थापना/लेखा विषयक संबंधित कर्मचारी यांना सदर दस्तऐवज ताब्यात घेणेसाठी २९/०३/२०२२ ते ०१/०४/२०२२ या कालावधीत या कार्यालयांत प्रतिनियुक्त करावे.

आपणांस असेही कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रातील परिच्छेद २ मधील अ ते फ नमूद अभिलेखांस पताका लावून अभिलेख तयार ठेवावेत. तसेच संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व पत्रातील अ.क्र.१ ते ५ अन्वये नमूद केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन शासकीय मुद्रणतंत्र संस्था,सर जे.जी.समुह कला महाविद्यालय आवार,डॉ.डी.एन.रोड,मुंबई येथे आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांना प्रतिनियुक्त करावे व चौकशी अधिकारी यांना अभिलेख पडताळणीकरीता संदर्भिय पत्रांत नमूद केलेल्या सुचनांप्रमाणे दस्तऐवज सादर करावेत.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत – संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४७३/ ४२४/ ४३४
ई-मेल- desk4a@dtemaharashtra.gov.in वेबसाइट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४अ/आस्था/२०२२/२०६ दिनांक 28 MAR 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/नागपूर /पुणे/औरंगाबाद

विषय :- कंत्राटी / हंगामी अध्यापकांच्या सेवा नियमित करण्याच्या चौकशीबाबत.

संदर्भ :- चौकशी अधिकारी, सेवानिवृत्त सहसचिव, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र. चौकशी- २०९/प क्र १/उ.तं.शि/२०२२/, दि. २५/०३/२०२२

शासन आदेश, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय क्र. यायाप्र-२८१५/प्र.क्र.१५०/१५/तांशि-७, दि.०४/१२/२०१९ अन्वये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील आणि शासकीय तंत्रनिकेतनामधील कंत्राटी अध्यापकांना सेवेत नियमित करताना काही अनियमितता झाली आहे किंवा कसे याचे चौकशीकामी चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. मा. चौकशी अधिकारी यांनी संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या विभागातील कंत्राटी अध्यापकांच्या सेवाविषयक अभिलेख जो संचालनालयाच्या दि. १६/०९/२०१७ च्या पत्रान्वये सुरक्षित सिलबंद करून ठेवण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरचा अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे.

मा. चौकशी अधिकारी यांना कंत्राटी अधिव्याख्यात्यांचा अभिलेख सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार सादर करावयाचा आहे. सदरचा अभिलेख पडताळणीकरीता सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार कंत्राटी अध्यापकनिहाय बाबनिहाय मा.चौकशी अधिकारी यांना सादर करावा. त्याकरीता आपल्या विभागातील व संबंधित संस्थेतील एका अधिकाऱ्याने चौकशीच्या कामाकाजाकरिता हजर राहणे अनिवार्य आहे. कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी/आस्थापनाविषयक कामकाज बघणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. संबंधित संस्थेने खालील नमूद सेवा तपशिलाच्या कागदपत्रांना पताका लावून, तो चौकशीसाठी घेऊन येणे आवश्यक आहे.

अ) कंत्राटी सेवेतील प्रथम नियुक्ती आदेश
ब) कंत्राटी सेवेतील पुनर्नियुक्ती आदेश
क) कंत्राटी सेवेत रुजू झाल्याचे पत्र
ड) कंत्राटी सेवेत नियुक्त झालेले अध्यापक रुजू झाल्याबाबत संस्थेने वरीष्ठ कार्यालयास पाठविलेले पत्र किंवा आदेशाची प्रत

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 28 MAR 2022 आवक क्र. ९९८८

इ) हजेरी पत्रक/बायोमॅट्रीक हजेरीची प्रत

फ) कंत्राटी अध्यापकांना मानधन अदा केल्याबाबतचा पुरावा (पगार पत्रक-बँकेत किंवा कोषागार कार्यालयात सादर केलेले विवरणपत्र).

यापूर्वी झालेल्या कागदपत्राच्या तपासणीमध्ये संबंधित संस्थामधील अधिकारी/कर्मचा-यांनी वरील प्रमाणे पताका न लावल्यामुळे, सेवानिवृत्ती किंवा बदल्यांमुळे नियुक्त नवीन अधिकारी व कर्मचारी यांना सेवाविषयक संबंधित कागदपत्र तात्काळ उपलब्ध करुन देता येत नव्हती. त्यामुळे चौकशी कार्यालयाचा बराच वेळ फुकट गेला, असे संदर्भाधिन पत्रान्वये कळविले आहे.

तसेच कागदपत्र पडताळणीकरिता उपस्थित राहताना खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. प्रत्येक संस्थेने त्यांच्याकरिता विहित केलेल्या दिवशी संबंधित कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवाविषयक तपशील घेऊन हजर रहावे

२. विभागीय कार्यालयाच्या अधिका-यांसोबत सर्व संस्थांनी एकाच दिवशी उपस्थित राहू नये.

३. शक्यतो प्रत्येक संस्थेने कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवाविषयक दस्तऐवज स्वतंत्रपणे आणावा.

४. असे अनुभवास आले आहे की, विभागी कार्यालये व संस्थामधील संबंधित अधिकारी/कर्मचारी कागदपत्रे तपासणी करण्याकरिता कार्यालयात उशिरा पोहोचतात. हे अधिकारी/कर्मचारी मुंबई बाहेरुन येत असल्याने व त्यांना राहण्याची व्यवस्था नसल्याने किंवा इतर कारणास्तव कागदपत्र तपासणीचे कामकाज त्याच दिवशी संपवावे असा आग्रह धरतात. सबब, यापुढे होणा-या तपासणीकरिता संबंधितांनी उशिरात उशिरा सकाळी १०.३० वाजेपर्यंत उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

५. कागदपत्र तपासणीचे कामकाज सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पूर्ण न झाल्यास राहावयाचा दुस-या दिवशी पुन्हा कार्यालयात हजर रहावे लागेल

यासंबंधीत सहसंचालक/प्राचार्य यांना काही अडचणी असल्यास त्यांनी श्री.गणेश शामराव सोनावणे, चौकशी अधिकारी तथा सेवानिवृत्त सहसचिव यांचेशी ९०८२४६२७३६/८९७६५८९६०७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : चौकशी अधिकारी, सेवानिवृत्त सहसचिव, महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणतंत्र संस्था, सर ज.जी. समुह कला महाविद्यालय, आवार, डॉ. डि एन.रोड, मुंबई -१

# कंत्राटी हंगामी अध्यापकांच्या सेवा नियमितकरणाच्या चौकशीचे वेळापत्रक

| अनुक्र. | संस्थेचे नाव | अध्यापक संख्या | | कागदपत्र पडताळणी दिनांक | दिवस |
|---|---|---|---|---|---|
| | | पदवी | पदविका | | |
| | **विभागीय कार्यालय अमरावती** | | | | |
| १. | यवतमाळ | -- | २० | ३०.०३.२०२२ | बुधवार |
| २. | वाशिम | -- | १३ ½ | ३१.०३.२०२२ | गुरूवार |
| ३. | मुर्तिजापूर | -- | ९ | ०१.०४.२०२२ | शुक्रवार |
| | सार्वजनिक सुटटी | | -- | ०२.०४.२०२२ | शनिवार |
| | रविवार | | -- | ०३.०४.२०२२ | रविवार |
| | | एकूण | ४२ ½ | | |
| | **विभागीय कार्यालय, नागपूर** | | | | |
| १ | नागपूर | ९ | १७ | ०४.०४.२०२२ | सोमवार |
| २ | चंद्रपूर | ४ | --- | ०५.०४.२०२२ | मंगळवार |
| ३ | गोंदिया | --- | ७ | ०६.०४.२०२२ | बुधवार |
| ४ | गडचिरोली | --- | ७ | | |
| ५ | ब्रम्हपूरी | --- | १८ | ०७.०४.२०२२ | गुरुवार |
| ६ | आर्वी | --- | ९ | ०८.०४.२०२२ | शुक्रवार |
| ७ | साकोली | --- | ९ १/२ | | |
| | शनिवार | | -- | ०९.०४.२०२२ | शनिवार |
| | रविवार | | -- | १०.०४.२०२२ | रविवार |
| | | एकूण | ६१ ½ | | |
| | **विभागीय कार्यालय, पुणे** | | | | |
| १ | पुणे | ७ | १६ | ११.०४.२०२२ | सोमवार |
| २ | मिरज | --- | ९ | १२.०४.२०२२ | मंगळवार |
| ३ | अवसरी खुर्द | २ | १० | १३.०४.२०२२ | बुधवार |
| | सार्वजनिक सुटटी | | -- | १४.०४.२०२२ | गुरुवार |
| | सार्वजनिक सुटटी | | -- | १५.०४.२०२२ | शुक्रवार |
| | शनिवार | | -- | १६.०४.२०२२ | शनिवार |
| | रविवार | | -- | १७.०४.२०२२ | रविवार |
| ४ | कराड | ९ | १४ १/२ | १८.०४.२०२२ | सोमवार |
| ५ | कोल्हापूर | --- | २० | १९.०४.२०२२ | मंगळवार |
| | | | | २०.०४.२०२२ | बुधवार |
| | | एकूण | ६७ ½ | | |

| विभागीय कार्यालय, औरंगाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जालना | ----- | ८ | २१.०४.२०२२ | गुरुवार |
| २ | नांदेड | ----- | १२ | | |
| ३ | जितूर | ----- | ११ | २२.०४.२०२२ | शुक्रवार |
| | शनिवाए | | --- | २३.०४.२०२२ | शनिवार |
| | रविवार | | -- | २४.०४.२०२२ | रविवार |
| ४ | लातूर | ----- | २३ | २५.०४.२०२२ | सोमवार |
| ५ | उस्मानाबाद | ----- | १५ | २६.०४.२०२२ | मंगळवार |
| ६ | औरंगाबाद | ७ | १४ | २७.०४.२०२२ | बुधवार |
| ७ | अंबड | ----- | १४ | २८.०४.२०२२ | गुरुवार |
| ८ | हिंगोली | ----- | १४ | २९.०४.२०२२ | शुक्रवार |
| ९ | बीड | ----- | १४ | ३०.०४.२०२२ | शनिवार |
| | | एकूण | १२५ | | |

(ग.शा.सोनावणे)
चौकशी अधिकारी तथा सहसचिव (से.नि.)